आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.:- MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ४८ वा ● बुधवार दि. १० जुलै २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये चालू शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे प्रयत्न

मुंबई, : राज्यात १० नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. मुंबई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास राष्ट्रीय वैद्यक परिषदेने ५० (एमबीबीएस) विद्यार्थी क्षमतेची परवानगी दिलेली आहे. उर्वरीत ९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे अर्ज राष्ट्रीय वैद्यक परिषदेमार्फत दर्शविण्यात आलेल्या त्रुटी पूर्ण करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले. मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जिल्हा गडचिरोली, जालना, वाशीम, हिंगोली, बुलढाणा, अमरावती, नाशिक, भंडारा, अंबरनाथ (जिल्हा ठाणे) आणि मुंबई (१० संस्था) येथे १०० (एमबीबीएस) विद्यार्थी क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याकरिता राष्ट्रीय वैद्यक परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आले होते.

# औशाच्या जनता दरबारातून मिटला राज्यातील महिला बचत गटांचा प्रश्न....!

## आ अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने अंगणवाडी आहार पुरवठा ई टेंडर प्रक्रिया रद्द

औसा – आ अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून गेल्या चार वर्षांपासून मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सुरू केलेल्या जनता दरबारात अनेक नागरिकांचे प्रश्न सुटत असतात यामुळे या जनता दरबाराला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असताना या जनता दरबारातून राज्यातील महिला बचत गटांचा प्रश्न मिटला असून औसा तालुक्यातील राजमाता जिजाऊ महिला बचत गट संघटनेच्या वतीने (दि.१८) जून रोजी च्या जनता दरबारात मागील दिवसात अंगणवाडी आहार पुरवठा हा बचत गटाच्या माध्यमातून पुरवला जात होता तरी त्याचे श टेंडर भरण्यात येत होते व ही टेंडर मुळे हजारो महिलांचे नुकसान होणार होते. तरी ई टेंडर प्रक्रिया रद्द करण्याचे निवेदन दिले व अवघ्या काही दिवसात आ अभिमन्यू पवार यांनी शासनदरबारी पाठपुरावा करून ई टेंडर प्रक्रिया रद्द करून महाराष्ट्रातील हजारो महीला भगिनींचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवला आहे. याबाबत राज्याचे महिला व बाल विकास विभागाचे सहसचिव वि. रा. ठाकूर यांनी अंगणवाडीतील ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार पुरवठ्याच्या अनुषंगाने बचत गटाच्या मागण्या उच्चस्तरीय समितीपुढे सादर करण्यात यावेत असे निर्देश असल्याने सद्यस्थितीत सुरू असलेल्या सर्व निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

औसा येथील या जनता दरबारात औसा तालुक्यातील राजमाता जिजाऊ बचत गट संघटनेच्या वतीने अध्यक्ष सुनीता महेश सुर्यवंशी, उपाध्यक्षा शालूबाई वसंत मोतीबने, सचिव उषा नागनाथ भोजने यांच्यासह महिलांनी यांनी सन २००७ पासुन



आजरोजीपर्यंत औसा तालुक्यातील करजगाव येथील अंगणवाडीत नियमित खंड न पडू देता विना तक्रारी गरमताजा बाला पोषण आहार नियमित पुरवठा केलेला आहे. सदर कार्यकाळात अंगणवाडी सेविका मदतनिस संपावर गेल्या असता आम्ही बालपोषण आहार पुरवण्यात कोणताही कसुर न करता बाल पोषण आहार चा नियमित पुरवठा चालु ठेवलेला आहे. तरी तालुक्यातील बचत गट सध्या चालु असलेल्या गरमताजा बाल पोषण आहार नियमित करावा व आमच्या बचत गटास कायम स्वरुपी सेवा प्रदान करण्यात यावी तसेच यापुढील ज्या बचत गटामार्फत आहार पुरवठा खंडीत झाला आहे त्या नविन बचत गटास आहार पुरवठा करण्यात यावा यापुढे १ ते ३ व ३ते ६ वयोगटातील लाभार्थी पुर्वीसारखे आम्हालाच देण्यात यावे अशी मागणी निवेदनाव्दारे आ अभिमन्यू पवार यांच्याकडे केली होती. याबाबत आमदार अभिमन्यू पवार यांनी पाठपुरावा करीत २००७ पासून महिला बचत गट मार्फत अंगणवाडी आहार पुरवठा करणार्या महिला भगिनींचा प्रश्न मिटवला आहे. मागील दिवसात अंगणवाडी आहार पुरवठा हा बचत गटाच्या माध्यमातून पुरवला जात होता तरी त्याचे श टेंडर भरण्यात येत होते व ही टेंडर मुळे हजारो महिलांचे नुकसान होणार होते. तरी औसा विधानसभा मतदारसंघातील महीला बचत गटाच्या महिला भगिनीं १८ जुन रोजी जनता दरबार मध्ये आमदार अभिमन्यू पवार यांच्या कडे ई टेंडर प्रक्रिया रद्द करण्यासाठी निवेदन दिले व अवघ्या काही दिवसात शासनदरबारी पाठपुरावा करून ई टेंडर प्रक्रिया रद्द करून महाराष्ट्रातील हजारो महीला भगिनींचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवला आहे.

एकंदरीत औसा मतदारसंघातील जनता दरबारात मतदारसंघातील शेकडो प्रश्न मिटवण्याचा यशस्वी प्रयत्न झाला आहे.एकाच व्यासपीठावर सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न ऐकून जागेवरच त्या समस्यांचे निराकरण केले जाते तर काही क्लिष्ट विषय मार्गी लावण्यासाठी संबंधित विभागाच्या माध्यमातून महिनाभरात ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो आशा या जनता दरबारातून महिला बचत गटाचा हा प्रश्न केवळ औसा मतदारसंघासाठी नाहीतर संपूर्ण राज्यातील महिला बचत गटांना दिलासादायक ठरणारा आहे..

### कृषी महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल – कृषिमंत्री धनंजय मुंडे

मुंबई : कृषी महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय



दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला जाईल, असे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११६ वी बैठक मंत्री श्री. मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली, त्यावेळी ते बोलत होते.

ड्झघ उ्रख्झठ चरपीरश्रू चींलरळ

यावेळी कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, कृषी परिषदेतील संचालक डॉ.हरिहर कौसडीकर राज्यातील चारही कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि परिषदेचे सदस्य दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी श्री. मुंडे म्हणाले की, कृषी महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी कृषी महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यापीठांनी आवश्यकतेनुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना ही मंत्री श्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीमध्ये एकूण ५४ विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये शिक्षण विभाग, संशोधन विभाग, विस्तार शिक्षण व साधनसामग्री विकास विभाग आणि प्रशासन या विषयासोबतच कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालय यांच्या प्रलंबित विषयांवरही चर्चा करण्यात आली.

### दुर्घटना टाळण्यासाठी धोकादायक ठिकाणी पर्यटकांना प्रवेश बंदी करा – पालकमंत्री शंभूराज देसाई

सातारा : जिल्ह्याच्या काही भागात चांगला पाऊस सुरु आहे. पावसाळी पर्यटनासाठी नागरिक मोठ्या बाहेर पडतात. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी धबधबे, जलाशये यासारख्या धोकादाय ठिकाणी ग्रामपंचायतींनी प्रवेश बंदीचे फलक लावावेत. त्याचबरोबर पाटण तालुक्यातील सडावाघापूर सारख्या ठिकाणी इतर ठिकाणी पोलीसांनी ग्रस्त वाढावावी व हुल्लडबाजांवर कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी अतिवृष्टी उपायोजनांबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे यंत्रणांचा आढावा घेतला. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समिर शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे यांच्यासह सर्व प्रांताधिकारी, गटविकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी पावसामुळे नाले, गटारी तुंबणार नाहीत यासाठी त्यांची स्वच्छता ठेवण्याचे निर्देश दिले. आवश्यक ठिकाणी गरजेनुसार नागरिकांचे स्थलांतर करावे लागल्यास त्यासाठी यंत्रणांनी सुरक्षित निवारे, त्या ठिकाणी पुरेसे अन्नधान्य, औषधसाठा याची तजबीज ठेवावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

दि. ९ जुलै रोजी सरासरी ३० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. पाऊसामुळे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. औषध व धान्याचा पुरेसा पुरवठा झालेला आहे. अतिवृष्टीमुळे स्थलांतराची वेळ आसल्यास त्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी बैठकीत सांगितले.




पक्षाच्या धोरणाला विरोध म्हणून यांनी आपला पक्ष सोडून नवीन पक्ष स्थापन केला. आता समविचारी पक्ष म्हणून आपल्याबरोबर युती व्हावी. अशी त्यांची इच्छा आहे!

# राजकीय पक्षांनी आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी – मुख्यमंत्री

मुंबई, : राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधीत राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होवू देणार नाही, अशी ग्वाही देऊन आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका, अभिप्राय शासनाला कळवावेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आरक्षणाबाबत सर्वपक्षीय बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री सर्वश्री चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखेपाटील, छगन भुजबळ, रवींद्र चव्हाण, शंभूराज देसाई, दादाजी भुसे, अतुल सावे, धनंजय मुंडे यांच्यासह खासदार अशोक चव्हाण, सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, गोपीचंद पडळकर, बच्चू कडू, भरत गोगावले, महादेव जानकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आरक्षणासंदर्भात विविध राजकीय पक्ष, संघटनांची भूमिका महत्वपूर्ण असून राज्यात मराठा, ओबीसी समाजाच्या आरक्षणाबाबत चर्चेतून मार्ग निघाला पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधीत राखली जातानाच जातीय सलोखा देखील कायम राहीला



पाहिजे अशी भुमिका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे मांडली.

मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तो कायद्याच्या चौकटीत टिकण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. हा निर्णय घेतल्यापासून शिक्षण, पद भरतीमध्ये मराठा समाजातील उमेदवारांना लाभ झाला आहे. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देतानाच अन्य समाज घटकांवर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. गॅझेटच्या तपासणीसाठी हैदराबाद येथे ११ जणांची टीम पाठविण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आरक्षण हा राजकारणाचा विषय नाही तर त्यातून सामाजिक सलोखा अबाधीत रहावा यासाठी शासनाची प्रामाणिक भुमिका आहे. त्यादिशेने शासनाची सकारात्मक प्रक्रिया सुरू असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्यात सौहार्दपूर्ण वातावरण कायम रहाव, यासाठी सर्वपक्षीय सदस्यांना विश्र्वासत घेऊन चर्चेतून मार्ग काढण्याबाबत आजची बैठक बोलावण्यात आली होती. मराठा आणि ओबीसी समाजातील कटुता दूर करण्यासाठी आजची बैठक होती. यापूर्वीही १ नोव्हेंबर २०२३ रोजी अशाच प्रकारे सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर मंत्री श्री. भुजबळ, श्री. मुंडे, विधानसभा उपाध्यक्ष श्री. झिरवाळ, सर्वश्री दरेकर, प्रकाश शेंडगे, अशोक चव्हाण, बच्चु कडु, सदाभाऊ खोत, प्रकाश आंबेडकर, सुरेश धस, अड. मंगेश ससाणे, कपिल पाटील, प्रशांत इंगळे आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

### ‘मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण’ योजनेच्या अमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात वॉर्डस्तरीय समिती

मुंबई, : ‘मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण’ या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात वॉर्डस्तरीय समिती गठित करण्यात येत आहे. याबाबतचा शासन आदेश महिला व बालविकास विभागाने



निर्गमित केला आहे. या समितीमुळे या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीला मदत होणार आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्यासह पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांच्या निर्णायक भूमिकेच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण’ योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आता वॉर्डस्तरावर समिती गठित करण्यात येणार आहे. नागरी भागात वॉर्ड अधिकारी स्तरावर लाभार्थी महिलांचे अर्ज स्वीकृती, तपासणी, पोर्टलवर अपलोड करण्यात येणार आहेत ‘अ+’, ‘अ’, ‘ब’ वर्ग महानगरपालिकांमध्ये वॉर्डस्तरीय संरचना आहे. त्यानुसार वॉर्डस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.

या महानगरपालिकांमध्ये वॉर्डस्तरीय समितीत अशासकीय सदस्य हे अध्यक्ष असतील. याशिवाय समाजकल्याण अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी (शहर) (ज्येष्ठतम), एक अंगणवाडी पर्यवेक्षिका (बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या मान्यतेने), संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), दोन अशासकीय सदस्य हे सदस्य असतील, तर संबंधित वॉर्ड अधिकारी हे सदस्य सचिव असतील.

या समितीत एकूण तीन अशासकीय सदस्य असतील. त्यापैकी एक जण हे अध्यक्ष असतील. या समितीचे अध्यक्ष आणि अन्य दोन अशासकीय सदस्यांची निवड संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. या समितीची आवश्यकतेनुसार बैठक होईल. तसेच समितीकडे योजनेची देखरेख व सनियंत्रण करणे, योजनेच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणे, योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेणे, प्राप्त झालेले अर्ज, त्यांची छाननी, तपासणी करणे, अर्जासमवेत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करणे आदी कामे असतील. वॉर्डस्तरीय समितीने त्यांच्याकडील प्राप्त अर्जांची छाननी करून तात्पुरती यादी प्रसिद्ध करावयाची आहे. तसेच त्यावर प्राप्त झालेल्या हरकती, आक्षेपांचे निराकरण करून तात्पुरती सुधारित पात्र, अपात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम मान्यतेसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील गठित जिल्हास्तरीय समितीकडे सादर करणे आवश्यक राहणार आहे.

### विभागीय आयुक्तांनी घेतला विविध महत्वपूर्ण विषयांचा आढावा

अमरावती, : नागरिकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध व्हावी यासाठी राज्य शासनाने नवीन वाळू धोरण मे-२०२३ पासून अंमलात आणले आहे. या धोरणानुसार सहाशे रुपये प्रतिब्रास याप्रमाणे वाळूचा दर निश्र्चित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने सामान्य नागरिकांना घरबांधकामासाठी सहजरित्या वाळू उपलब्ध व्हावी, यासाठी अवैध वाळू



उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासोबत वाळू धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी जिल्हा प्रशासनाला आज दिले. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयुक्तालयांतर्गत येत असलेल्या विविध महत्वपूर्ण विषयांचा आणि वाशिम जिल्ह्यातील शासकीय कामांचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी घेतला. डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, सामान्य नागरिकांना घरबांधकामासाठी वाळू उपलब्ध होत नाही, अशी ओरड विभागात केली जाते. समाजातील गोर-गरीब व सामान्य जनतेला घरकुल, शौचालय बांधकामासाठी वाळू उपलब्ध होण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अधिक सजगपणे काम करावे. वाळू घाटांच्या लिलावासह वाळू डेपोंची निर्मिती करावी. तसेच जिल्ह्यातील अनधिकृत वाळूचे उत्खनन व वाहतूकीस कडक कारवाई करुन प्रतिबंध घालावे. आंतरराज्य वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी चेक पोस्टवर सुक्ष्मरित्या कागदपत्रांची तपासणी व महसूल अधिकाऱ्यांच्या गस्तीचे प्रमाण वाढवावे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – शासकीय योजनेच्या प्रचारासाठी ५० हजार योजना दूत नियुक्त करून त्यांच्या मार्फत विविध योजनांची माहिती शहरी-ग्रामीण भागात पसरविली जाणार असून त्यासाठी पाच हजार पाचशे कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती सरकारी सूत्रांनी सोमवारी दिली, शेतकरी-शेतमजूर कामगार रोजगार असल्याने उपासमारी जगत असतानाही उधळपट्टी कशासाठी हेच कळत नाही डोकं सैराट बनते आहे.

दुसरा – अरे, सरकारी खजिना त्यात लोककर-महसूल आणि उद्योग भांडवलदाराचा लोक कल्याण निधी असतो यांच्या कोणाचे काय जाते तू कशाला सैराट बनवून घरच्यांना रस्त्यावर आणतो आहेत.

एक – अहो, सुशिक्षित बेरोजगार, बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार एवढा खोपावला असतानाही उधळपट्टी कशासाठी करायचं हेच कळत नाही विरोधक गप्प कसे.

दुसरा – अरे, विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. ज्या काही योजना आहेत त्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही अवतरली आहे ती घरोघरी पोहोचली तरच मतदानात भर पडेल त्यातून विजयाची खात्री मिळेल म्हणून ही धडपड आहे.

एक – अहो, आजवर हे केले नाही मात्र आताच दहा लाख तरुणांना प्रशिक्षण देऊन त्यातील ५० हजार तरुणाला काय मिळेल मग त्यांनी प्रशिक्षण घ्यावे कधी आणि त्या-त्या योजनाचा प्रचार कसा करावा हेच कळत नाही डोकं बधिर झाले.

दुसरा – अरे, यातून सुशिक्षित बेकाराची नोकरी नोकरी अशी ओरड तरी कमी होईल आणि विधानसभा निवडणुकीचा खर्चही सरकारी खजिन्यातून होईल हे सरकारचे धोरण आहे त्यात तुम्ही किंवा कोणीच अडवू शकत नाही कारण सत्ताधारी-विरोधक हे सारेच उद्याला निवडणुकीतील उमेदवार असणार आहेत मग झाले.

एक – अहो, हे असले लोकप्रतिनिधी काय कामाचे आहेत. जनतेचा पैसा जनतेलाच फसविण्यासाठी खर्च करायचा ही काय रीत झाली.

दुसरा – अरे, बोलणारे-टीका करणारी करीत-बोलत राहतीलच वर नरेंद्रजी आहेत खाली फडणवीस, शिंदे पवार ठरलेलेच आहेत मग कावळ्याच्या ओरडण्याने सत्तेला साप सुगणार आहे थोडाच. तो बीळ जवळ करणारच हे लक्षात ठेव.

# विरोधकांनी गांभीर्याने घ्यावे !

## संपादकीय...

हिंदुत्वावरून सध्या रणकंदन होते आहे. भाजपाचा मोदी हिंदुत्ववाद आणि राहुल गांधी यांचा सॉप्ट हिंदुत्ववाद हा धर्मनिरपेक्ष भारताच्या संविधानाला परवडणारे दिसत नाही. ज्या हिंदुत्वाशी धर्मनिरपेक्ष भारताच्या संविधानाची काही देणे घेणे नाही असा कांगावा करून भाजपाने गेली दहा वर्ष सत्ता भोगली. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, सामाजिक न्याय ही भारतीय राज्यघटनेचा-संविधानाचे मूळ स्त्रोत आहे. यावर कुरघोडी करून हिंदुत्वाच्या भारतीय शब्दस्तोयारावर मोदी सरकारने भाजपच्या बहुमतावर राज्य केले पण गेल्या लोकसभा निवडणुकीत हिंदू कार्डाला घसरण आली आणि काँग्रेस-इंडिया महाविकास आघाडीला अधिकचे बळ मिळाले असले तरी इतर पक्षाच्या आधारावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे पुन्हा हिंदू कार्डाची छाप मारू पहात आहेत परंतु विरोधी खासदाराचे संख्याबळ-एक जूट आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेतेपद काँग्रेसच्या राहुल गांधी यांच्याकडे असल्याने विरोधी संसद सदस्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन मोदी सरकारचा पाडाव करणे गरजेचे असल्याची कुजबूज राजकीय वर्तुळातून होताना दिसते आहे ती वास्तव वाटते.

काँग्रेस मुक्त भारताचे हाळी गेली दहा वर्षापासून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देत आहे पण वास्तवात आजघडीला भाजपची घसरण होताना दिसते आहे चारसो पारचा नारा बहुमताचा आघाडीही गाठू शकला नाही. याचाच अर्थ भावना अशी ठीक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस-काँग्रेसमुक्त भारत म्हणून नकळतपणे काँग्रेसचा प्रचार-प्रसार करून भाजपला घसरण आणली ही एक संधी विरोधकाकडे आहेत या संधीचा फायदा उचलणे हे ही तितकेच महत्त्वाचे ठरते अशी ही लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

तेलगू देशमचे चंद्राबाबू नायडू, जेदयुचे मुलायम सिंह वगैरे भाजपा-मोदी सरकार बरोबर असले तरी ते त्यांनी समता-स्वातंत्र्य, बंधुभाव, न्याय, धर्मनिरपेक्षता जोपासून आहेत तसा डावा त्या दोन्ही नेत्यांनी भाजपा-मोदी शी सहमती दर्शविताना केला होता. ते अटळ आहे कशाचीही मदत घेणे हे विरोधी सदस्याचे अनिवार्य कर्तव्य ठरते असे म्हटल्यास वावगे ठरू नये. कारण परिस्थितीनुसार एकमेकांना सहमती देणे-सहकार्य घेणे हे लोकशाहीतील मूळ आहे असे असले तरी गफलत होता कामा नये असे वाटते.

राम मंदिर, हिंदुत्व, गरिबांना मोफत धान्य, धार्मिक संस्था, देवस्थान निधी पुरविणे, महिलांना मानधन अशा भावनिक विषयावरून भोळ्या महिला-पुरुषांना भाजपा-मोदीने आपलेपणाचे जाळे टाकले परंतु राहुल गांधी, इंडिया महाविकास आघाडीचे अटकाऊ करून भाजपा-मोदी यांच्या व्युव्हरचेतेतुन आव्हान दिले आणि शरद पवार, मल्लिका अर्जुन खरगे, अखिलेश यादव वगैरेनी मोदी हटवा मोहीम उघडायवी पण भिरूड इतके खोलवर पोहोचले होते की ते कसे-बसे उपाय कारक ठरले हे यश हवे तेवढे नसले तरी मोदी सरकारला कोंडीत पकडून राम माणसात आहे की मंदिर-दगडात आहे अस्मजात विचारण्यासाठी पूरक ठरावा अशीच प्रतिक्रिया प्रसार माध्यमातून उमटताना दिसते आहे.

महागाई, भ्रष्टाचार, लाचकोरी, बँक कर्ज उडणे प्रकरण, अन्याय-अत्याचार, बेरोजगारी, शिक्षित बेकाराचे प्रश्न वगैरे अनेक विषय लोकसभा-राज्यसभेत चर्चेसाठी महत्त्वाचे पुरेसे-हे लक्षात घेऊनच विरोधी संसद सदस्यांनी गांभीर्यपूर्वक विषय मांडून हिंदुत्व आणि विश्र्वगुरू त्वाचा पडदा फास करण्याची संधी घालू नये. हीच लोकशाही भारतासाठी-संविधानासाठी भारत महासत्ता बनविण्यासाठी नादी ठरू शकते यातूनच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पायउतार होऊन विश्र्वगुरू बनण्याचे स्वप्न पुरे होण्यात अडथळा इंडिया महाविकास आघाडीने आजचा असा भारत मोदीजींना झाला तरी ते स्वतः होऊन आनंदात तरी निवडू, शकतील अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते ती राहुल गांधी व इंडियावाल्याची पूर्णत्त्वास न्यावी हीच अपेक्षा.

## 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभासाठी बँकेत खाते आवश्यक

मुंबई : 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' या योजनेचे निकष जाहीर करण्यात आले असून योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र महिलेचे बँकेत बचत खाते असणे आवश्यक आहे.

या योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता अशी : लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याची रहिवासी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परितक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित महिला, किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत, या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे : योजनेच्या लाभासाठी ऑनलाइन अर्ज करावा, लाभार्थ्याचे आधार कार्ड असावे, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल, तर त्याऐवजी त्या महिलेचे १५ वर्षांपूर्वीचे रेशनकार्ड, १५ वर्षांपूर्वीचे मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जन्मदाखला यापैकी कोणतेही एक ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.), परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल, तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र यापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत असणे अनिवार्य आहे.) मात्र, पिवळे व केशरी रेशन कार्डधारकांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सूट मिळणार आहे. बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत अनिवार्य नाही. पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणि योजनेच्या अटी- शर्तीचे पालन करण्याबाबतचे लाभार्थ्याचे स्वाक्षरीसह हमीपत्र आवश्यक आहे.

योजनेच्या लाभार्थ्यांची अपात्रता : ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. ज्याच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे. कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा निवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत

# वाढती लोकसंख्या सर्वच बाबतीत जगाला घातक सावधान!

लोकसंख्या अशीच वाढत राहाली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रासजगातील प्रत्येक व्यक्तीला,संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल.वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले.

ही बातमी जगभर पसरली.त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवु लागले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी) गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली.या शिफारशी नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती.यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले.यानंतर आफ्रिका, युरोप,उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता.भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती.ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे.हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

२०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन, भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्राझील, नायजेरिया, बांगलादेश, रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात.हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भुभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भुभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे.त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा.वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे.यामुळे बेरोजगारी,भुकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन, आरोग्य विषयक सुविधांचा अभाव,औषधांची समस्या, मुलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्याचप्रमाणे कारखाने व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरीता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे.म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे.त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेतांना दिसतात.भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने एक परीवार एकच अपत्य असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल.अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर मानुस मानसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात.

भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे.आज जगाला लोकसंख्या वाढी पेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे.कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे.त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे.याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी सुखसमाधानासाठी लोकसंख्या वाढवीली आहे.

त्यामुळे आज हिंसक प्राणी मानववार आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे. ही परीस्थिती मानवाने स्वतःहुन ओढावली आहे.मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसत आहे.त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहे.म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भुभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते.कोव्हिड-१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे.चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात. त्यामुळे चीन विस्तारवादाचे घृनीत कृत्य करतांना दिसतो.हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे.चीनच्या विस्तारवादाच्या भुमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक-मेकावर बंदुक ताणुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे.यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही.

त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ,कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो.यामुळे घातक बीमाऱ्यासुध्दा होवु शकतात आणि होत आहे.यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे.याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे.जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे.लोकांच्या सुखसुविधांकरीता विमान वाहातुक,रोड वाहातुक,रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दीसतात यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे.

त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत. कारण वाढती लोकसंख्या देशाला दीवसेंदीवस घातक ठरत आहे.काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु-पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल.हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत रहाली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आनले पाहिजे. लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येवु शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे.

जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत रहाली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतीरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही.त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होने गरजेचे आहे.केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वो तोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशांनी आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर) मो. नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## लिट्ल मास्टरला अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा !

क्रिकेट हा आज सर्वाधिक लोकप्रिय खेळ आहे. भारत हा आज क्रिकेटमधील दादा संघ आहे मात्र सत्तरच्या दशकापर्यंत भारत हा क्रिकेटमधील लिंबूटिंबू संघ समजला जात होता. त्या काळी फक्त कसोटी क्रिकेट खेळले जायचे भारताने कसोटीत विजय मिळवला ही मोठी बातमी असायची. भारताने कसोटीत विजय मिळवला ही बातमी दुर्मिळ असायची. भारताला जो विजय मिळायचा तो अर्थात भारतातच मिळायचा.

भारताबाहेर परदेशात विजय मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज हे त्या काळातील दादा संघ. त्यांना त्यांच्या देशात जाऊन हरवायचे ही अशक्यप्राय गोष्ट समजली जायची. अशीच अशक्यप्राय गोष्ट भारताने शक्य केली ती १९७१ साली. १९७१ साली भारताचा संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर गेला होता. त्या संघात एक छोट्या चणीचा मराठी मुलगा भारतीय संघात प्रथमच खेळत होता. त्याची ती पहिलीच कसोटी मालिका. समोर वेस्ट इंडिजच्या वेगवान गोलंदाजांचा तोफखाना. हा छोट्या चणीचा मुलगा सलामीला खेळायला गेला. नुसताच खेळायला गेला नाही तर तो खेळाला असा खेळला की त्याने आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत विश्र्वविक्रम केला. आपल्या पहिल्याच कसोटी मालिकेत ते ही वेस्ट इंडिजच्या तोफखान्यासमोर त्याने विक्रमी ७७४ धावा काढल्या. त्याचा हा विश्र्वविक्रम अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही हे विशेष.

त्याच्या या विक्रमी फलंदाजीने भारताने पहिल्यांदाच वेस्ट इंडिजला वेस्ट इंडिजमध्ये हरवले आणि या छोट्या चणीच्या मराठी मुलाची दखल जगाने घेतली. आपल्या पहिल्याच मालिकेत विक्रमी धावा काढणारा हा मुलगा होता सुनील मनोहर गावस्कर. हो तोच सुनील गावस्कर जो पुढे जाऊन भारतीय संघाचा आधारस्तंभ बनला. ज्याने अनेक विश्र्वविक्रमांना गवसणी घातली. ज्याने डॉन ब्रॅडमन यांच्या २९ शतकांच्या शतकी खेळीचा विक्रम मोडून ३४ शतके काढली. कसोटी क्रिकेटमध्ये दहा हजार धावांचा टप्पा पार करणारा जो पहिला खेळाडू ठरला. ज्याने आपल्या देशाला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले त्याच सुनील गावस्कर यांचा आज ७५ वा वाढदिवस. १० जुलै १९४९ रोजी मुंबईत जन्मलेले सुनील गावस्कर हे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वोत्तम आघाडीचे फलंदाज म्हणून ओळखले जातात.

१९७१ ते १९८७ असे सतरा वर्ष त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले या दरम्यान त्यांनी १२५ कसोटी सामन्यात ५१.१२ च्या सरासरीने १०,१२२ धावा काढल्या. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, वेस्ट इंडिज, पाकिस्तान, न्यूझीलंड अशा सर्वच संघाविरुद्ध त्यांनी खोऱ्याने धावा काढल्या. त्या काळातील गोलंदाज आजच्या सारखे नव्हते. आग ओकणारे गोलंदाज होते. वेस्ट इंडीजचे अँडी रॉबर्ट्स, जोएल गार्नर, माल्कम मार्शल, मायकल होल्डींग, पॅट्रिक पॅटरसन, इंग्लंडचे बॉब विलिस, जॉन स्नो, इयान बॉथम, पाकिस्तानचे इम्रान खान, सरफराज खान, ऑस्ट्रेलियाचे जेफ थॉमसन, डेनिस लिली केवळ नाव घेतले तरी थरकाप उडतो. हे गोलंदाज नव्हते तर फलंदाजांचे कर्दनकाळ होते. त्यांच्या समोर धावा काढणे तर दूरच पण उभे राहणे देखील मुश्कील होते. अशा खुंखार गोलंदाजांसमोर सुनील गावस्कर खोऱ्याने धावा काढत असे ते त्यांच्या तंत्रशुद्ध फलंदाजीच्या जोरावर. सुनील गावस्कर यांची गणना क्रिकेटच्या इतिहासात सर्वात तंत्रशुद्ध फलंदाज अशी केली जाते. ते फलंदाजीस उतरत तेंव्हा पायाला पॅड आणि हातात ग्लोज एव्हढेच सुरक्षेचे साधने घालून. सुनील गावस्कर यांनी हेल्मेट कधीही वापरले नाही ते कायम डोक्यावर स्कल कॅप घालायचे. स्कल कॅप घालूनच त्यांनी त्या काळातील वेगवान गोलंदाजांचा सामना केला आणि खोऱ्याने धावा काढल्या.

या दरम्यान त्यांना लिटल मास्टर पदवी मिळाली. आजही त्यांच्या नावापुढे लिटिल मास्टर असेच लिहिले जाते. या दरम्यान त्यांनी भारतीय संघाचे कर्णधारपदही सांभाळले. १९८३ चा विश्र्वचषक जिंकून देण्यातही त्यांचा मोलाचं वाटा होता. ते केवळ उत्कृष्ट फलंदाजच नव्हते तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षकी होते. त्यांनी कसोटीत १०० हून अधिक झेल टिपले. यष्टिरक्षक सोडून कसोटीत १०० हून अधिक झेल घेणारा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला. कसोटीतील त्यांच्या अद्वितीय कामगिरीमुळे १९८० मध्ये त्यांना विस्डेन या क्रिकेटमधील प्रसिद्ध मासिका तर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन् रुईंस व वन डे वंडर ही तीन पुस्तके लिहिली.

आज ते समालोचन आणि स्तंभलेखन करतात. आज त्यांची पंच्याहत्तरी म्हणजेच आज त्यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस. सुनील गावस्कर यांना अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! त्यांना निरोगी आयुष्य लाभो हीच परमेश्र्वर चरणी प्रार्थना.

Happy birthday little master

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## फार्मसी क्षेत्रातही आता लातूर दयानंद पॅटर्न देशपातळी वर गाजला विद्यार्थी जीपॅट परीक्षेत देशातून ११ वा

(लातूर वार्ताहर ):- भारत सरकारच्या मानव विकास संसाधन मंत्रालयाच्या वतीने अखील भारतीय स्तरावर फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या जीपॅट (ग्रॅज्युएट फार्मसी अपटीट्युड टेस्ट) या परीक्षेत लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयातील बी.फार्म चतुर्थ चा विद्यार्थी अक्षय काळे याने उत्तुंग असे यश मिळवत जीपॅट २०२४ च्या परीक्षेत देशातून ११ वा क्रमांक पटकावला आहे.याच विद्यार्थ्याने नायपर २०२४ च्या परीक्षेत देशातून ५६ वा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्याच्या या यशा बद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते



यांनी त्याचा सत्कार केला. या प्रसंगी शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे,डॉ.रघुनाथ वडूळकर,प्रा.रोहित सारडा, जीपॅट विभागप्रमुख डॉ.अर्चना येलमटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अखिलभारतीय स्तरावर छइएचड या संस्थे द्वारे हि परीक्षा घेण्यात येते. यातून विद्यार्थ्यांना वार्षिक १,५०,०००/- रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त होते. महाविद्यालया मार्फत जीपॅट सेल द्वारे प्रथम वर्षा पासूनच या परीक्षेची तयारी करून घेण्यात येते. या अंतर्गत विद्यार्थ्यांना विशेष शिकवणी वर्ग घेतले जातात. या सह सदरील विद्यार्थ्यांना चउट सोडविण्या साठी विशेष प्रशिक्षण दिले जाते. अक्षय ने आपल्या यशाचे श्रेय कठोर परीश्रमासह महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापक वृंदांच्या मार्गदर्शनाला दिले.महाविद्यालयातील सर्वंकष सोइ सुविधे मुळे व ग्रंथालयीन पुस्तकांच्या आणि ई संसाधनांच्या सोई मुळे हे यश प्राप्त करू शकलो असे मनोगत या प्रसंगी व्यक्त केले.

विद्यार्थ्याच्या घवघवीत यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी,कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते, जीपॅट विभागप्रमुख डॉ.अर्चना येलमटे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंदानी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## लायन्स फॅमिली लातूरच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

लातूर : लायन्स फॅमिली लातूरच्या वर्ष २०२४ – २५



च्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा नुकताच पदग्रहण अधिकारी लायन्सचे उप जिल्हा प्रांतपाल – २ ला. राहुल औसेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूरच्या हॉटेल अरोमा मध्ये उत्साहात पार पडला. उपप्रांतपाल ला. राहुल औसेकर यांनी सर्व नविन पदाधिकाऱ्यांना शपथ दिली.

या सोहळ्यास नवनिर्वाचित खा. डॉ. शिवाजीराव काळगे, माजी प्रांतपाल डॉ. गोपाळराव पाटिल , माजी प्रांतपाल डॉ. मन्मथ भातांब्रे व झोन चेअर पर्सन ला. पी.विवेकानंद, ला. तुकाराम पाटील , रिजन प्रियाच्या रिजन चेअर पर्सन प्रिया ठाकूर मॅडम या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रिया ठाकूर यांनी ह्यावर्षी लायन्स परिवारात सहभागी झालेल्या नविन सदस्यांचे प्रेरण केले व शपथ दिली . यावेळी लायन्स परिवाराच्या वतीने खा. डॉ. काळगे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी आपले विचार व्यक्त करताना खा. डॉ. काळगे यांनी आपण एक लायन परिवाराचा एक भाग असल्याचा आपल्याला गर्व असल्याचे सांगितले. लायन्स परिवारास लागणारी सर्व मदत देण्यासाठी मी सदैव तत्पर असेन असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.

यावेळी पुढील सर्व नूतन पदाधिकाऱ्यांनी पदग्रहण केले. लायन्स क्लब लातूर अध्यक्ष एमजेएफ ला. अशोक पांचाळ , सचिव ला. सुदर्शन कंजे , कोषाध्यक्ष ला. गोपाळप्रसाद अवस्थी , लायन्स क्लब लातूर मिडटाऊन अध्यक्ष ला. शरद मोरे , सचिव ला. संजीवनी गोजमगुंडे , कोषाध्यक्ष ला. स्वाती भोयरेकर , लायन्स क्लब ऑफ लातूर सिटी अध्यक्ष एमजेएफ ला. नागनाथ गित्ते , सचिव ला. योगेश शिंदे , कोषाध्यक्ष ला. ईश्र्वरप्रसाद चांडक (कोषाध्यक्ष ), लायन्स क्लब लातूर वुई केअर अध्यक्ष ला. नागनाथ घायाळ , सचिव ला. विशाल गिरी , कोषाध्यक्ष ला. नितीन शिंदे ( ), लायन्स क्लब लातूर हेल्पिंग हॅन्ड्स अध्यक्ष ला. डॉ.अजय नारायणकर , सचिव ला. डॉ.अश्र्विनी नारायणकर , कोषाध्यक्ष ला. सौरभ सुतार , लातूर लिओ लायन लेजेंड अध्यक्ष ऋतुजा पवार, सचिव कल्पना पांचाळ , कोषाध्यक्ष मानसी माडे तर लिओ क्लब लातूर डीसीसीएल साठी नविन पदाधिकारी म्हणून लिओ राहुल वर्मा (अध्यक्ष), लिओ संजना शिंदे (सचिव),लिओ भक्ती साळुंके (कोषाध्यक्ष ) म्हणून यांची निवड करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. योगेश शिंदे ,ला. सुदर्शन कंजे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे आयोजन ला. धनंजय बेंबडे ,ला. राजेश मित्तल,ला. सुधाकर जोशी यांनी आकर्षक व नियोजनपूर्वक केले होते. या कार्यक्रमासाठी व तसेच लायन्स व लिओ परिवार लातूरचे सर्व संचालक , पदाधिकारी , सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज परत एकदा नकळत मुंगी तळ्यात पडली

स्वतःला वाचविण्यासाठी झाडाचं पान आणि कबुतराची वाट पाहू लागली.मीच का सतत हिला वाचवावे हा कबुतराचा अहंकार आड आला.



झाडावरच बसून असहाय मुंगीला मरताना पाहू लागला. कबुतराने मदत करावी म्हणून मुंगी जिवाच्या आकांताने ओरडली.कबुतर आपल्याच विचारात मश्गुल,

मुंगी असहायतेमुळे गतप्राण झाली.कबुतर आपल्याच गर्वात गढून गेला.पारधी येणार हेच विसरून गेला.पारध्यानेही याच संधीचा फायदा घेतला कारण प्रत्येक वेळेला निशाना साधल्यावर मुंगी पायाला चावायची आणी निशाना चुकायचा म्हणुन मुंगीच्या अनुपस्थितीत डाव साधला.कबुतर आणि मुंगी दुर्दैवीपणाने गेले.

झाड मात्र त्या दिवशी खूप रडले.मुंगी,कबुतर मेल्याचं दुःख होतंच.पण त्याहूनही परोपकाराची भावना मेल्याचं होतं. मित्रांनो कोणाला कोणाची कधीही गरज किंवा मदत लागते. अहंकार नाशाकडे नेतो तर सेवा ही आनंदी जीवनाचे सार्थक ठरते.सर्वांशी प्रेमाने वागा व सर्वांकडून प्रेम मिळवा.हा जन्म पुन्हा नाही.

**भंते शाक्यपुत्र राहुल ९८३४०५०६०३,वाडेगाव अकोला.**

## ईआर-१ विवरणपत्र सादर करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका) : सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसुचित करण्याची सक्ती करणारा) कायदा –१९५९ अन्वये कलम –५ मधील तरतुदीनुसार शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनेत काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सांख्यिकी माहितीचे तिमाही विवरणपत्र ईआर-१ प्रत्येक तिमाही संपताच पुढील ३० दिवसाच्या आत सादर करणे संबंधित आस्थापनेस बंधनकारक आहे. त्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविण्यता विभागाने विकसित केलेल्या संकेतस्थळ www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३० जुलै, २०२४ पर्यंत भरणे आवश्यक आहे.

उद्योजक, आस्थापना यांना ऑनलाईद्वारे विवरणपत्र भरताना काही तांत्रिक अडचण येत असतील, तर त्यांनी ०२३८२-२९९४६२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## केसांसाठी 'ही' हेअर ट्रीटमेंट होऊ शकते धोकादायक! वेळीच आपल्या केसांची काळजी घ्या

शारीरिक आरोग्याबरोबरच केसांची काळजी घेणेही तितकेच गरजेचे आहे. आपले केस सॉफ्ट, घनदाट आणि चमकदार बनवण्यासाठी आपण अनेक प्रकारचे उपचार घेतो. केसांवर अनेक प्रकारच्या ट्रीटमेंटस घेतो. पण अनेक वेळा या ट्रीटमेंटमुळे केसांचं आणखी नुकसान होते. चमकदार, लांब आणि घनदाट केस सर्वांनाच आवडतात, पण, सुंदर दिसण्याच्या स्पर्धेत अनेक ट्रीटमेंट करून आपले केस आणखी कमकुवत होतात.

आपल्या जीवनशैलीचा थेट परिणाम त्वचेवर तसेच केसांवर दिसून येतो. ताणतणाव, हानिकारक प्रोडक्टसचा वापर आणि केसांची काळजी घेण्याच्या अनेक उपचारांमुळे केस गळण्यासारख्या समस्या उद्भवू शकतात. चला तर जाणून घेऊयात कसोंच्या अशा कोणत्या ट्रीटमेंटस आहेत जे केसांसाठी धोकादायक ठरू शकतात.

केराटिन ट्रीटमेंट

केराटिन ट्रीटमेंटचं नाव आपण अनेकदा ऐकलं असेल. चांगल्या केसांसाठी, लोक त्याचे परिणाम जाणून न घेता केराटिन ट्रीटमेंटचा वापर करतात. केराटिन ट्रीटमेंट बर्‍याच प्रकरणांमध्ये प्रभावी ठरते परंतु काही काळासाठीच ती आपल्या केसांसाठी चांगली वाटते.



या ट्रीटमेंटमुळे केस दीर्घकाळ कमकुवत होतात. केसतज्ज्ञांच्या मते ही ट्रीटमेंट सर्व प्रकारच्या केसांसाठी योग्य नाही. त्यामुळे केस गळण्याचा धोका असतो.

कांद्याचं तेल

कांद्याचे तेल कोरोना नंतरच्या सौंदर्य उपचारांपैकी एक होते. केसगळती रोखण्यासाठी कांद्याचा रस वापरण्याबाबत आपण अनेकदा ऐकले आहे. पण यामुळे केसांनाही धोका होऊ शकतो. कांद्याचे तेल एक अँटी-ऑक्सिडेंट आहे ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात सल्फर असते जे तुमच्या केसांसाठी चांगले असते. पण या सल्फरमुळे तुमच्या केसांच्या त्वचेत जळजळही होऊ शकते. हे तेल केस गळण्यापासून बचाव करते असं म्हणतात मात्र, आतापर्यंत याबाबत कोणाताही शास्त्रीय पुरावा उपलब्ध नाही.

तसेच, जर तुम्ही निवडलेल्या केसांची काळजी घेण्याच्या ट्रीटमेंटमुळे तुमचे केस कोरडे आणि कमकुवत होत असतील किंवा तुमच्या केसांमध्ये कोंडा अधिक वाढत असेल, तर तुम्ही तुमच्या समस्येबद्दल चांगल्या डॉक्टरांचा वेळीच सल्ला घेणं आवश्यक आहे.

## च्यवनप्राशचे सेवन करणे 'या' लोकांना पडू शकते महागात; कारण...

आपल्या सगळ्यांनाच आपल्या आरोग्याची काळजी असते त्यातून हिवाळा आला की आपल्याला आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अशा काळात आपण उष्ण पदार्थांचे सेवन करतो जेणेकरून आपल्या शरीराला आराम मिळेल. त्यातील एक पदार्थ म्हणजे च्यवनप्राश. च्यवनप्राशचे अनेक फायदे आपल्या शरीरासाठी आहेत. पण तुम्हाला माहितीये का की काही लोकांना च्यवनप्राश खाणं आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतं. च्यवनप्राश हे औषध आहे खरं परंतु च्यवनप्राश खाणं 'या' लोकांनी वेळीच टाळावे. च्वयनप्राश खाल्यानं रोगप्रतिकारशक्ती वाढते. च्यवनप्राशमध्ये मध, साप केशर, पांढरी मुसळी आणि तमालपत्र यांसारखे गुणधर्म असतात. यांचे मिश्रण त्यात असते. त्यामुळे हे आरोग्यासाठी पोषक असते. परंतु काही लोकांनी च्यवनप्राश सेवन करणं टाळावे. कोणत्या लोकांनी च्यवनप्राशचे सेवन करू नये? चला जाणून घेऊया.



कोणी चवनप्राशचं सेवन करू नये?

१. मधुमेह पेशंट

मधूमेह रूग्णांनी चुकूनही च्यवनप्राशचे खाऊ नये. अनेकदा लोकं च्यवनप्राशला आरोग्यदायी म्हणून खातात तर काही च्यवनप्राशची चव संतुलित ठेवण्यासाठी त्यात थोडंस गोडही गोष्टी टाकतात. परंतु हे चुकीचे असून यावेळी मात्र तुम्ही च्यवनप्राश खाणं टाळावे. च्यवनप्राश खाल्ल्यानं शरीरातील साखरेचे प्रमाण वाढू शकते आणि जर तुम्हाला मधूमेह असेल तर वेळीच च्यवनप्राश खाणं टाळा कारण त्यानं तुमची शारिरीक समस्या आणखीनं वाढू शकते.

२. किडनी पेशंट –

वर म्हटल्याप्रमाणे, हिवाळ्यात आपण उष्ण पदार्थ खाण्याचा प्रयत्न करतो जेणेकरून आपल्या शरीराला त्याचा फायदा होईल. त्यात आपण च्यवनप्राश खातो. परंतु च्यवनप्राशचा प्रभाव हा उष्ण असल्यानं ते पचायला अत्यंच जड जाते. जर तुम्हाला किडनी संबंधित कुठलेही आजार असतील अथवा तुम्हाला कुठला त्यासंबंधी रोग असेल तर तुम्ही च्यवनप्राश खाणं टाळलं पाहिजे.

३. पोटाचे विकार –

ज्यांना पोटाच्या समस्या आहेत त्यांनी च्यवनप्राशचे सेवन करू नये. वर म्हटल्याप्रमाणे च्यवनप्राश हे पचायला जड असते त्यामुळे शक्यतो पोटाच्या समस्यांनी जर तुम्ही आजारी असाल तर तुम्ही च्यवनप्राशचे खाऊ नका. काहींना भरपेट जेवल्यानंतरही च्यवनप्राश खायची सवय असते. त्यामुळे त्यांना नंतर अपचन किंवा पोटाच्या समस्या वाढू लागतात तेव्हा अशांनी च्यवनप्राश खाऊ नये.

४. ब्लड प्रेशर रूग्ण –

जर तुम्ही उच्च रक्तदाब असेल तर तुम्ही च्यवनप्राशचे सेवन टाळावे कारण च्यवनप्राशची उष्णता तुम्हाला त्रासदायक ठरू शकते.

## राशी भविष्य १० जुलै २०२४

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पूर्व

नवीन ओळख फायदेशीर राहील. समाजात आपल्याला मान सन्मान यश मिळेल. व्यापारीक स्थिती अनकुल राहील. मोठेपणा दाखवण्यापासून दूर रहा.

वृषभ : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर

अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण होती. इच्छेप्रमाणे फायदा होण्याचे योग आहेत. सगे सोयऱ्यांच्या भेटी होतील. आर्थिक गुंतवणूक फायदेशीर राहील. बोलण्यावर नियंत्रण राखा.

मिथुन : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: दक्षिण

जबाबदारीचे कामे स्विकारू नका. कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. कामकाजात मान सन्मान मिळेल. कायदेशीर कामे वेळेत पूर्ण करा.

कर्क : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: दक्षिण

अपेक्षेप्रमाणे कामकाजात यश मिळणार नाही. मुलांच्या गैर कामामुळे आपली छबी खराब होण्याची शक्यता आहे. वेळेचा दुरूपयोग करू नका. आरोग्य चांगले राहणार आहे.

सिंह : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:उत्तर

समाजातील प्रतिष्ठीत व्यतिंफ्च्या भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल. वडिलांच्या आरोग्याची काळजी राहील. आर्थिक उत्पन्न वाढणार आहे.

कन्या : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व

परिश्रमाचा योग्य मोबदला मिळेल. कौटुंबिक सुख शांती मिळेल. विचार पूर्वक घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

तुळ : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम

आपल्या परिश्रमाचे योग्य फळ मिळेल. चांगली स्थिती निर्माण होईल. व्यावसायिक यश मिळाल्याने मनोबल वाढेल. विरोधक आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

वृश्चिक : शुभ रंग:केसरी,शुभ दिशा: पश्चिम

जीवनसाथीशी वाद विवाद, मतभेद होतील. खर्चात वाढ होईल. आपल्या बुद्धीचा उपयोग योग्य केला तर काही प्रमाणात यश मिळेल. एकंदर दिवस चांगला जाणार आहे.

धनु: शुभ रंग : निळा, शुभ दिशा :दक्षिण

आपली जबाबदारी योग्यरितीने पार पाडताल. भेट वस्तु मिळण्याचे योग आहेत. मुलांच्या प्रकृतीची काळजी मिटेल. नवीन कामात यश मिळेल. चोरांपासून सावध रहा.

मकर: शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:उत्तर

प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. विश्वास घालवू नका. व्यापार, व्यवसायात सावधानी बाळगा. आर्थिक व्यवहार जपून करा.

कुंभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम

महत्वकांक्षा पूर्ण होतील. व्यापारात आपल्या प्रयत्नांना यश मिळेल. खरेदी विक्रीचे व्यवहार सुरळीत पार पडतील. आपल्या व्यसनांवर नियंत्रण ठेवा.

मीन : शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:उत्तर

नौकरीमध्ये बदली, पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. आपल्या विश्वासावर अटळ रहा. व्यवहारीक निर्णय गुप्त ठेवा. आर्थिक स्थिती सुधारण्याचे योग आहेत.

१० जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य व चंद्राचा प्रभाव आहे. तुमची बौध्दिक क्षमता उच्च दर्जाची आहे. आकलनशक्ती, उत्तम ग्रहणशक्ती सुक्ष्म आहे. सळाळत्या उत्साहाने तुम्ही नेहमी भारलेले असता. त्यामुळे इतरजणही प्रभावीत होतात. तुम्ही अंत:करणाने दिलदार उदार आहात. इतरांची दु:खे तुम्हाला पहावत नाहीत. ती दूर करण्यासाठी तुम्ही समाजकारणात, राजकारणात भाग घेता. नेतृत्वाचे गुण तुमच्या अंगी जन्मजात असतात. भ्रष्टाचार तुम्हाला आवडत नाही. काही आदर्श समाजात प्रस्थापित व्हावेत म्हणून तुम्ही झटता.

प्रत्येक प्रश्न प्रतिष्ठेचा करण्याची गरज नाही. आपल्या महत्वाकांक्षी स्वभावाला परिस्थितीनुसार थोडीशी मुरड घाला. इतरांचा सल्ला, मार्गदर्शनाचाही लाभ घ्या. अति बौध्दिक श्रम, शारीरिक श्रमाचा ताण हृदयावर पडू देऊ नका. डोळ्यांच्या विकारावर तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्या.

कार्यक्षेत्र : मनाच्या व्यापारांबल सखोल ज्ञान असल्याने वैद्यकीय मानसशास्त्र हा तुमच्या आवडीचा विषय राहील.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा होणार पुरवठा

लातूर, (जिमाका) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्यात येतो. सन २०२४-२०२५ मध्ये या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र बचतगटांनी १० ऑगस्ट २०२४ पर्यंत समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेच्या मार्गदर्शक सूचना ८ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार निश्र्चित करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाच्या ु.ारहरीरिहीर.र्सीं.ळप या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध आहे. तरी इच्छुक व पात्र बचतगटांनी १० ऑगस्ट २०२४ पर्यंत समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त एस. एन.चिकुर्ते यांनी केले आहे.

## बालविवाह निर्मुलनासाठी जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये होणार जनजागृती

लातूर, (जिमाका) : उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्हा कृती दलाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे नुकतीच झाली. जिल्ह्यातील निवडक १२५ शाळांमध्ये इयत्ता सहावी ते इयत्ता दहावीचे विद्यार्थी आणि पालकांमध्ये बालविवाह निर्मूलनविषयक जनजागृती सत्र आयोजित करण्याचे नियोजन यामध्ये करण्यात आले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील, शिक्षण विभागाचे डी. के. हैबतपुरे, एम. जे. ढमाले, बाल विकास प्रकल्प अधिकारी व्ही. एच. निपाणीकर, परीविक्षा अधिकारी धनंजय जावळगे, आयसीडीएस पर्यवेक्षक ए. बी. सूर्यवंशी, ॲड. छाया माळवडे आणि ॲड. छाया आकाटे (बाल न्याय मंडळ), वरिष्ठ प्रकल्प समन्वयक श्री. कांबळे, सिद्धराम गायकवाड आणि सहाय्यक प्रकल्प समन्वयक श्रुती वाघमोडे यांची यावेळी उपस्थिती होती.

जिल्ह्यातील निवडक १२५ शाळांमध्ये इयत्ता सहावी ते दहावीचे विद्यार्थी आणि पालकांमध्ये बालविवाह निर्मूलनविषयक जनजागृती सत्र महिला व बालविकास विभागाच्या सहकार्याने, युनिसेफ आणि सेंट्रल फॉर सोशल न्ड बिहेव्हीअर कम्युनिकेशन (एसबीसी-३) यांच्या आर्थिक सहकार्याने कलापंढरी संस्थेने नियुक्त केलेल्या ४० स्वयंसेविका यांच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. जिल्हा समन्वयक चाइल्ड हेल्प लाईनचे बापू सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मुस्लिम धर्मगुरु मृतदेहाची हेळसांड करणाऱ्या राजकीय(दुत)व्यक्ती,तहसील प्रशासन,पोलिस अधिकार्यांना तात्काळ निलंबित करुन गुन्हे दाखल करा -शेख रशिद

माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील दिंद्रुड येथील मुस्लिम धर्मगुरु शेख सुलेमान यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या दफनविधी करण्यास मज्जाव करणार्या तहसील व पोलिस प्रशासन वरिल अधिकारी यांना तात्काळ निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करा तसेच राजकीय(दुत) व्यक्तीची चौकशी करुन कारवाई करा नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करु,असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील तहसील आणि पोलीस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरू(आमीर साहाब) यांचा दफनविधी का रोखण्यात आला हयात राजकीय व्यक्तिंचा हात असुन ह्याची तात्काळ चौकशी करण्यात यावे.तसेच दिंद्रुड येथील बाजारतळा लगत असलेल्या कब्रस्तानच्या जागेचे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागेत कब्रस्तान असुन त्या जागेत शेकडो कबरी आहेत असे असतांना पोलीस प्रशासनाने तहसीलचे आदेश असल्याचे सांगून दफनविधी थांबण्यात आले हे प्रशासनावरची काळा दाग असुन एका विशिष्ट धर्मावर आघात करण्यात आली आहे.यात राजकीय (दुत) व्यक्ती असुन त्यांच्या बोलण्यावरून तहसील व पोलिस प्रशासनाने मुस्लिम धर्मगुरु यांचे मृतदेहाची हेळसांड केली असुन याची तात्काळ चौकशी करुन राजकीय (दुत)व्यक्ती,तहसील व पोलिस प्रशासनातील सर्व अधिकारी यांना निलंबित करुन तात्काळ गुन्हे दाखल करावे,नसता लोकशाही मार्गाने एमआयएम पक्षातर्फे तिव्र आंदोलन करु,असा इशारा एमआयएम शहराध्यक्ष शेख रशिद यांनी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

## मार्केट कमिटीच्या संपामुळे होणारी शेतकर्यांची अडवणूक तात्काळ थांबवावी – माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर : लातूर मार्केट कमिटीमध्ये मागील काही दिवसापूर्वी हमाल गाडीवानांच्या प्रश्नांमुळे मार्केट बंद होते. त्यावेळेसही प्रश्न वेळेत सोडवण्यात मार्केट कमिटीला यश आले नाही. त्यामुळे शेतकरी, कामगार, व्यापारी या सर्वांचे मोठे नुकसान झाले. त्याप्रमाणे खरेदीदार व आडते यांचा माल खरेदी नंतर द्यावयाच्या पेमेंट मागणीसाठी गेल्या सोमवारपासून मार्केट यार्डात सौदा निघाला नाही. शेतकर्यांचा माल खरेदीदाराने खरेदी केल्यानंतर २४ तासात त्या धान्याचे पेमेंट केले पाहिजे हा कायदा आहे. असे असताना मार्केट यार्डात अनेक व्यापार्यांना कोट्यवधी रूपयाचे माल खरेदीचे पेमेंट अद्याप दिले नाही. त्यावर मार्केट कमिटीने पैसे वसूलीची कार्यवाही केली नाही. त्यावेळी अनेक आडते, शेतकरी उध्वस्त झाले आहे. अशी लेखी माहिती राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे व पणन मंत्री ना.अब्दुल सत्तार यांना देऊन शेतकर्यांची आडवणूक करणार्या मार्केट कमिटीवर कार्यवाही करण्याची मागणी मा.आ.तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केली आहे.

आपण कृषी उपन्न बाजार समिती सभापती पदावर कार्यरत असताना व्यापार्याची पॉपर्टी विकून शेतकर्यांचे पैसे दिले. माझ्या कार्यकाळात उजेडचे खरेदीदार यांनी खरेदी केलेल्या मालाचे पेमेंट दिले नाही, अशी माहिती काही आडत्यांनी मला दिली. तेव्हा त्या खरेदीदाराचे मार्केट यार्डातील मोक्याचे ठिकाणचे आडत दुकान लिलाव करून विक्री केले व आडत्याचे पेमेंट देऊन टाकले. मार्केट कमिटी सभापती हे शेतकरी, आडते, हमाल गाडीवान, खरेदीदार, गुमास्ते यांना न्याय देणारे असले पाहिले. यासाठी कठोर कार्यवाही करण्याची गरज भासल्यास तेही केले पाहिजे, परंतु विद्यमान मार्केट कमिटीच्या सभापतीकडून हे होताना दिसत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने याकडे त्वरीत लक्ष देऊन शेतकर्यांना सुगीच्या काळात अडचणीतून बाहेर काढावे अशी मागणीही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री महोदय व पणन मंत्री यांच्याकडे केली आहे.

## शेतकऱ्यांचे हित पाहून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाची पुनर्रचना : मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील

मुंबई, : सर्वप्रथम शेतकऱ्यांचे हित पाहून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. या विभागांची पुनर्रचना करतांना कोणत्याही शासकीय अधिकारी–कर्मचारी यांच्यावर अन्याय होणार नाही, त्यांना नियमित पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, याचा सर्वसंमतीने विचार करावा, अशा सूचना महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे–पाटील यांनी मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत दिल्या.

या बैठकीला आमदार श्री.राहुल कुल, आमदार श्री.जयकुमार गोरे, आमदार श्रीमती मनीषा कायंदे, आमदार श्रीमती मंजुळा गावित, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे अपर सचिव राजेश कुमार यांच्यासह महाराष्ट्र राजपत्रित पशुवैद्यक संघटना, महाराष्ट्र पशुचिकित्सक संघटना, पशुसंवर्धन कर्मचारी वृंद संघटना, खासगी पशु वैद्यकीय संघटना आणि विध्यार्थी संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्रिमंडळांच्या दिनांक १३ मार्च २०२४ च्या बैठकीत पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या पुनर्रचनेबाबत निर्णय घेण्यात आला होता. ही पुनर्रचना करतांना लोकसंख्येनुसार प्रचलित धोरणात बदल करून पायाभूत सुविधेतही बदल करणे आवश्यक असल्याचे मत मंत्री श्री.विखे–पाटील यांनी मांडले. विभागाची पुनर्रचना करतांना त्यात कोणत्याही त्रुटी राहू नये, अशा सूचनाही त्यांनी केल्या. या बैठकीत पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग यांची पुर्नरचना करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर दोन्ही विभागातील सुधारित आकृतिबंध, नवीन पदे आणि सेवा जेष्ठता अशा विविध मुद्यांवर मंत्री श्री.विखे–पाटील आणि विविध संघटनेचे पदाधिकाऱ्यांत चर्चा करण्यात आली.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात रोजगाराभिमुख व कौशल्याधिष्ठित शिक्षणातून विद्यार्थी घडतील – कुलगुरु डॉ.मनोहर चासकर यांचे प्रतिपादन

लातूर : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्राध्यापक,संस्थाचालक व महाविद्यालय स्तरावर अनंत अडचणी येत असल्या तरीही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक दृष्टीने प्रत्येकांनी पुढे पाऊल टाकून या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी केली पाहिजे.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसारचे व्हर्टिकल स्ट्रक्चर,कोर्स आऊटकम्स प्रत्येक प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कळाले पाहिजेत.प्राध्यापकांनी स्वतःच्या विषयासोबत इतरही विषयाचे ज्ञान अवगत करून अध्ययन–अध्यापन पद्धतीत सुधारणा केली पाहिजे.शिक्षण प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा वापर करून नाविन्यपूर्ण संशोधन करत प्राध्यापकांनी संशोधनाचा दर्जाही सुधारला पाहिजे,तरच विद्यार्थी खऱ्या अर्थाने घडतील.विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य दिले पाहिजे.जेणेकरून आपापल्या आवडीच्या विषयामधून तळागाळातला,बहुजन आणि ग्रामीण भागातला विद्यार्थीही घडण्याला वाव मिळेल.प्राध्यापकांनी स्वतःच्या वर्कलोडसाठी विद्यार्थ्यांना विषय निवडीचे बंधन करू नये.कारण नवीन शैक्षणिक धोरणात कोणत्याही विषयाच्या प्राध्यापकांच्या वर्कलोडवर परिणाम होणार नाही.विद्यार्थ्यांना क्वालिटी शिक्षण,नोकरीची हमी व आर्थिक निर्भरता याची पूर्ण शाश्वती नवीन शैक्षणिक धोरणात आहे.नवीन शैक्षणिक धोरणातील रोजगाराभिमुख व कौशल्याधिष्ठीत शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य निश्चितच घडेल,असे प्रतिपादन नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मनोहर चासकर यांनी केले.

लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय,लातूर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०९ जुलै २०२४ रोजी ' यूजी कार्यक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० ची प्रभावी अंमलबजावणी ' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन झाले.यावेळी ते प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी होते.याप्रसंगी व्यासपीठावर स्वारातीम विद्यापीठ,नांदेड येथील विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील,स्वारातीम विद्यापीठ,नांदेडचे परीक्षा आणि मूल्यमापन




मंडळाचे संचालक डॉ.दिगंबर नेटके,स्वारातीम विद्यापीठ नांदेडचे व्यवस्थापन समिती सदस्य डॉ.डी.एन.मोरे,डॉ.नरेंद्र चव्हाण,डॉ.सूर्यकांत जोगदंड,डॉ.संतराम मुंडे,डॉ.बाविस्कर,दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करत असताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी असे म्हणाले की,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षासाठी लागू झाले असून अभ्यासक्रमात खूप बदल झालेला आहे.या संदर्भात आयोजित करण्यात आलेली ही केवळ कार्यशाळा नसून ज्ञानसभा आहे.एनईपीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संस्थास्तरावर आम्ही पूर्णतः सज्ज आहोत.बदलत्या काळानुसार शिक्षणात बदल होणे खूप गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास,गुणवत्तापूर्ण शिक्षण व नोकरीची खात्री मिळणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे समाजात खूप बदल होत आहेत.प्राध्यापकांनीही ग्रंथालयातील पुस्तकांचे जास्तीत जास्त वाचन करून विद्यार्थी, समाज व देश घडविला पाहिजे.प्राध्यापकांनी जागतिक पातळीवर जास्तीत–जास्त कोर्सेस केले पाहिजेत.विज्ञान–तंत्रज्ञानाचा शिक्षणात अवलंब करून विद्यार्थ्यांची ज्ञानगंगा झाली पाहिजे असे ते म्हणाले.

यावेळी डॉ.नरेंद्र चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट झाले पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांना विषय व शाखा निवडीचे योग्य मार्गदर्शन प्राध्यापकांनी केले पाहिजे.कारण चांगला समाज व देश घडवण्याचे सामर्थ्य हे शिक्षकांतच आहे असे त्यांनी सांगितले तर डॉ.बाविस्कर यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रत्येकांनी चिकित्सकपणे अभ्यास करून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम कसे झाले पाहिजे याविषयी योग्य मार्गदर्शन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले.तसेच डॉ.दिगंबर नेटके,डॉ.डी.एन.मोरे व डॉ.एम.के.पाटील यांनीही कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.मेघा पंडित यांनी केले.याप्रसंगी लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य,एनईपी नोडल ऑफिसर,विभागप्रमुख आणि प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

## गुणवंत जंगम विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी समाजाने पुढे यावे : खा. डॉ. शिवाजी काळगे

लातूर : गुणवंत जंगम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी



समाजाने मदतीसाठी पुढे येणे गरजेचे आहे. कारण गुणवंत विद्यार्थी यशस्वी झाल्यासच खऱ्या अर्थाने समाजाची सर्वांगीण उन्नती होऊ शकणार आहे, असे प्रतिपादन खा. डॉ. शिवाजी बंडप्पा काळगे यांनी केले.

लातूर जिल्हा सकल जंगम समाजाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन लातूरच्या गिरवलकर मंगल कार्यालयात करण्यात आले होते. हा सोहळा अंबाजोगाई मठ संस्थानचे ष . ब्र . गुरु शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सान्निध्यात पार पडला. त्यावेळी खा. डॉ. काळगे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार स्वामी हुंडेकरी हे होते. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय जंगम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रावण राजेंद्र जंगम, सूर्यकांत पत्रे , संतोष कोळळे, एड. सांबप्पा गिरवलकर, चंद्रशेखर हुंडेकरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या भव्य सत्कार करण्यात आला. दहावी – बारावी परीक्षेतील गुणवंतांसह विविध शासकीय सेवेत दाखल झालेल्या जंगम समाजातील मान्यवरांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी यावेळी बोलताना गुणवंत विद्यार्थ्यांनी त्यांचे कर्तृत्व सिद्ध केल्यास समाज त्यांना डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही,असे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या नियमित अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. जीवनात यशस्वी होण्यासाठी स्पर्धा परीक्षांकडे वळावे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या समाजातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीस्तही समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्यांनी स्वतः होऊन पुढे यावे. आपणही अशा विद्यार्थ्यांना सदैव सहकार्य करण्यास तत्पर असल्याचे त्यांनी नमूद केले.

शंभुलिंग शिवाचार्य महाराजांनी यावेळी बोलताना विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांना केलेली मदत , सहकार्य कायम सर्वांच्या लक्षात राहत असते. त्यामुळे गुणवंतांना मदत करण्यासाठी लोकांनी पुढे येणे गरजेचे आहे, असे सांगितले. आपल्या माता – पित्याच्या पुण्याईने विद्यार्थी घडत असतात. जीवनात संस्काराला खूप महत्व आहे. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेला जातानाच आपल्या आई – वडिलांच्या पाया न पडता, दररोज त्यांच्या पाया पडून आशीर्वाद घ्यावेत. आई –वडिलांना कधीही विसरू नयेअसे त्यांनी यावेळी सांगितले. श्रावण जंगम यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना आपल्या जंगम समाजातील मुलांना आपले कुळ , धर्माची माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्या समाजाने शैक्षणिक, सामाजिक, मानसिकदृष्ट्या मजबूत होणे काळाची गरज आहे. पालकांनीही आपल्या पाल्यांकडे सूक्ष्म लक्ष देणे गरजेचे बनले आहे. पालकांनी आपल्या पाल्यांवर चांगले संस्कार करणेही आवश्यक आहे. उच्च शिक्षणासाठी आपल्या मुलींना दुसऱ्या शहरात पाठवताना हेच संस्कार खूप मोलाचे ठरणार आहेत. लव्ह जिहाद सारख्या घटनात आपल्या समाजाला लक्ष्य केले जात असल्याबद्दल चिंता व्यक्त करून जंगम यांनी मुला – मुलींनी जीवनात आई – वडिलांची मन शरमेने खाली जाणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन केले. या कार्यक्रमात विश्र्वनाथ सावळे यांनी समाजातील तीन गुणवंतांना प्रत्येकी पाच हजार रुपयांचे धनादेश शैक्षणिक मदत म्हणून प्रदान केले. त्यांचाही यावेळी शंभूलिंग शिवाचार्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक मन्मथ स्वामी बाभळगावकर यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्र्वभूमी विशद केली. सूत्रसंचालन कुमार स्वामी गणाचार्य, शिवकांत स्वामी, रेणापूरचे स्वामी गुरुजी यांनी केले. तर आभार प्रदर्शन त्र्यंबक स्वामी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दयानंद स्वामी कोकलगे,योगेश स्वामी, महादेव बालकुंदे, डॉ.संजय स्वामी, डॉ.अशोक सांगवीकर, निजलिंग रावणगावे, राम स्वामी, शरणाप्पा दावणगिरे यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

## लातूर जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): जिल्हा माहिती कार्यालय, लातूर येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणीकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके दिनांक १९ जुलै २०२४ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर दिनांक १९ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सादर करावीत. कार्यालयीन वेळेत रद्दी पाहावयास मिळेल. रद्दी खरेदीदाराकडे इलेक्ट्रॉनिक वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत. रद्दी विक्रीचे दरपत्रक मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपूर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर यांना राहतील, असे लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे परिवाराचे युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकरांकडून सांत्वन

लातूर : भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मातोश्री प्रभावतीताई कृष्णाराव बावनकुळे यांचे अल्पशा आजाराने काही दिवसापूर्वी निधन झाले. या घटनेची माहिती मिळताच भाजपा युवा नेते तथा भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन बावनकुळे परिवाराचे सांत्वन केले. यावेळी युवा नेते तथा भाजपा युमोचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या समवेत भाजपा युमोचे प्रदेश उपाध्यक्ष अरूण पाठक, भाजपा माजी प्रदेश सचिव दत्ता चेवले, भाजपा युमोचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे आदी उपस्थित होते.

## इतिहासात आजचा दिवस १0 जुलै

अंतरराष्ट्रीय

१२१२ – लंडन शहराचा मोठा भाग प्रचंड आगीच्या भक्ष्यस्थानी.
१५८४ – ऑरेंजच्या विल्यम पहिल्याची राहत्या महालात हत्या.
१६८५ – इंग्लिश गृहयुद्ध – लँगपोर्टची लढाई.
१७७८ – अमेरिकन क्रांती – फ्रांसने युनायटेड किंग्डम विरुद्ध युद्ध पुकारले.
१७८९ – अलेक्झांडर मॅकेन्झी मॅकेन्झी नदीच्या मुखाशी पोचला.
१७९६ – कार्ल फ्रीडरिक गॉसच्या सर्वप्रथम लक्षात आले की कोणताही आकडा जास्तीत जास्त तीन त्रिकोणी आकड्यांची बेरीज असतो.
१८५० – मिलार्ड फिलमोर अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी.
१८९० – वायोमिंग अमेरिकेचे ४४वे राज्य झाले.
१९२५ – तास या सोवियेत संघाच्या वृत्तसंस्थेची स्थापना.
१९२५ – उत्क्रांतीवाद शिकवल्या बद्दल अमेरिकेच्या डेटन, टेनेसी शहरात जॉन टी. स्कोप्स या शिक्षकावर खटला भरण्यात आला.
१९४० – दुसरे महायुद्ध – विची फ्रांसच्या सरकारची रचना.
१९४७ – मोहम्मद अली जिना पाकिस्तानच्या गव्हर्नर–जनरलपदी.
१९६२ – टेलस्टार या जगातील पहिल्या संदेशवाहक उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९६७ – न्युझीलंडने आपले चलन दशमान पद्धतीत आणले.
१९६८ – मॉरिस कुव्ह दि मुरव्हिल फ्रांसच्या पंतप्रधानपदी.
१९७३ – बहामाला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९७३ – पाकिस्तानने बांगलादेशचे स्वातंत्र्य मान्य केले.
१९७६ – इटलीत सेव्हेसो येथे विषारी वायुगळती. ३,००० प्राणी मृत्युमुखी. ७०,००० अजून प्राण्यांची कत्तल.
१९७८ – मॉरिटानियात लश्करी उठाव.
१९९१ – बोरिस येल्त्सिन रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदी.
१९९२ – मादक द्रव्यांच्या तस्करी बद्दल पनामाच्या भूतपूर्व अध्यक्ष मनुएल नोरिगाला फ्लोरिडात ४० वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा.
२००० – नायजेरियात फुटलेल्या तेलवाहिकेत स्फोट. त्यातून गळणारे पेट्रोल भरण्यासाठी जमलेल्यांपैकी २५० व्यक्ती ठार.
२००३ – हाँगकाँगमध्ये बस अपघातात २१ ठार.
२००६ – इटालीने २४ वर्षाच्या दीर्घकाळानंतर चौथ्यांदा विश्वचषक जिंकला.
२००६ – फ्रान्सचा कर्णधार जिनेदीन जिदानला विश्वचषकातील सर्वश्रेष्ठ खेळाडूचा बहुमान मिळाला. त्याला गोल्डनबॉल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
२००६ – पाकिस्तान आंतरराष्ट्रीय एअरलाइन्सचे एक विमान मुल्तानमध्ये दुर्घटनाग्रस्त होऊन त्यातील सर्व ४५ प्रवाशी ठार झाले.
२००६ – मध्य पोर्तुगालच्या जंगलात लागलेली भीषण आग नियंत्रणाबाहेर झाल्याने अग्निशामक दलाचे सहा कर्मचारी ठार झाले.
२००७ – पाकिस्तानमधील लाल मस्जिदवर पाकिस्तान सेनेचे सायलेंस ऑपरेशन समाप्त झाले. या ऑपरेशन दरम्यान जवळ–जवळ १०० दहशतवादी ठार झाले तर गोळीबारात सेनेच्या एका प्रमुखासह ९ सैनिक ठार झाले. ऑपरेशन सायलेंसमध्ये लाल मस्जिदचा उप प्रमुख अब्दुल राशिद गाजी हे देखील ठार झाला.

राष्ट्रीय

१८०० – कोलकाता येथे फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना.
१९३९ – मदुराई येथील मिनाक्षी मंदिर हरिजनांना खुले करण्यात आले.
२००६ – भारताचा इन्सॅट–४ सी या आधुनिक संचार उपग्रहाचे प्रक्षेपण अयशस्वी झाले.
२००७ – छत्तीसगडच्या दंतेवाडा जिल्ह्यात पोलिस व दहशतवादी यांच्यामध्ये झालेल्या चकमकीत २४ पोलिस कर्मचारी शहीद झाले तसेच या चकमकीत ५० दहशतवादी ठार झाले.
२००८ – पोलिसांनी चेन्नई किनारपट्टीवर चेन्नईवरून मेलेशियात तस्करी करण्यात येणारे सुमारे दीड कोटी किमतीचे हिरे हस्तगत केले.

जन्म

१४१९ – गो–हानाझोनो, जपानी सम्राटचा जन्म.
१४५२ – जेम्स दुसरा, स्कॉटलंडचा राजाचा जन्म.
१८५६ – निकोला टेसला, वैज्ञानिकचा जन्मचा जन्म.
१८६७ – मॅक्सिमिलियन, जर्मनीचा चान्सेलरचा जन्म.
१९१३ – पद्मा गोळे, आधुनिक मराठी कवयित्रीचा जन्म.
१९२० – ओवेन चेंबरलेन, अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचा जन्म.
१९२० – आर्थर एश, अमेरिकन टेनिस खेळाडूचा जन्म.
१९२३ – गुरूनाथ आबाजी कुलकर्णी, कथाकारचा जन्म.

## 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' उपक्रमातून ११ दिवसांत ५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची सेवा

मुंबई : आषाढी वारीनिमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी



पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्य विभाग 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबवित आहे. या उपक्रमातून गेल्या ११ दिवसांत ५ लाख १२ हजार ५५३ वारकऱ्यांवर विनामूल्य उपचार करण्यात आले आहेत. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली हा विशेष उपक्रम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सुरू करण्यात आला आहे.

संत ज्ञानेश्र्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि राज्यातील सुमारे एक हजार दिंड्यांमध्ये सहभागी झालेले लाखो वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनासाठी निघाले आहेत. त्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने सलग दुसऱ्या वर्षी 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर एक आपला दवाखाना तयार केला असून ६ हजार ३६८ आरोग्य अधिकारी, कर्मचारी वारकऱ्यांना आरोग्य सेवा देत आहेत. तात्पुरत्या रुग्णालयात दाखल करून २,३२७ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. पालखी आणि दिंडी मुक्कामी असणाऱ्या ठिकाणी ५ खाटांचे तात्पुरते अतिदक्षता विभाग तयार केला आहेत. येथे ऑक्सिजन मॉनिटर, औषधी यांच्यासह तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत.

या आषाढी वारीमध्ये डॉक्टर, नर्स, आरोग्य सहाय्यक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार असे सर्व कर्मचारी सेवा देत आहेत. पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर 'आपला दवाखाना' आहे. यासह ताप, सर्दी, खोकला, ड्रेसिंग, जुलाब चा त्रास कोणाला होत असेल तर त्यासाठी ॲम्बुलन्स बाईक तैनात ठेवण्यात आली आहे. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर मोठी गर्दी असल्याने प्रत्येक ठिकाणी रुग्णवाहिका फिरू शकत नाही. त्यामुळे फिरती बाईक ॲम्बुलन्स सज्ज ठेवण्यात आली आहे.

फिरत्या ॲम्बुलन्सबरोबरच १०२ व १०८ या ॲम्बुलन्सही पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत आहेत. तसेच पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आले आहे. याबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोय करण्यात आली आहे.

'आरोग्याची वारी.. पंढरीच्या दारी' उपक्रम थोडक्यात

प्रत्येक ५ किमी अंतरावर 'आपला दवाखाना' :२५८, वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका २४ बाय ७ उपलब्ध : ७०७, दिंडी प्रमुखांसाठी वितरीत केलेले औषधी कीट : ५८८५, महिला वारकऱ्यांसाठी स्त्री रोग तज्ज्ञ : १३६, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना : १३६, पालखी मार्गावर आरोग्य दूत : २१२, पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ : ९, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ बेडची क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष : ८७, आरोग्य शिक्षण व संवादावर आधारित आरोग्य ज्ञानेश्र्वरी उपक्रम.

## साहित्य सम्राट डॉ अण्णा भाऊ साठे यांचा सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी राज क्षिरसागर यांची निवड झाली.

लातूर –साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे यांचा १०४ व्या जयंतीची बैठक डॉ अण्णाभाऊ साठे चौक येथे नुकतीच संपन्न झाली या बैठकीत सर्वानुमते अध्यक्षपदी राज सतीष क्षिरसागर यांची निवड करण्यात आली यावेळी समाजातील सर्व



स्तरातील जेस्ट तथा सामाजिक कार्यकर्ते,समाज सेवक उपस्थित होते.ही बैठक माजी नगरसेवीका केशराबाई महापुरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी सूचक म्हणून मोहन सुरवसे यांनी राज क्षिरसागर याच्या नावाची घोषणा केली तर त्यांना अनुमोदन सुनील बसपुरे यांनी दिले .या ठरावाला समस्त समाजानी पाठींबा दिला. या वेळी जी. ऐ. गायकवाड, नारायण कांबळे, अंगद वाघमारे, सुरेश चव्हाण,सुनील सौदागर,पिराजी साठे, मस्के लक्ष्मीमण , रवी अर्जुन,योगेश उपाडे,नूतन हाणमंते, दिग्विजय साठे,प्रवीण सूर्यवंशी, पपू मगर,सचिद्र कांबळे, दयानंद उपाडे शाम चव्हाण, सुरज लोंढे, नारायण जोगदंड, सुनील जोगदंड, सुरज शिंदे,अश्र्विनी कांबळे, विशाल भोगे,रवी पेताडे, करण कांबळे, आकाश शिंदे, बालाजी,कलवले, राजेश लोंढे,जय मस्के,काका कांबळे, विष्णू कांबळे, तानाजी शिंदे, अशोक झेंडे, सह अनेक कार्यकर्ते समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894